# तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी : २६२०६०१, २६९०६०२, २६४११५०/५१ फॅक्स : २६९२१०२

तार : EDUTECH E-mail : desk 4@dte.org.in web:http://www.dte.org.in


परिपत्रक

क्र.४/४अ/आस्था/अनुदानित /२०१२/ १०४

दिनांक :- 27 जनवरी JAN 2012

प्रति,

सर्व प्राचार्य/संचालक,

शासन अनुदानित अशासकीय पदवी व पदविका

संस्था तसेच स्वायत्त संस्था.

विषय : मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याच्या कार्यवाहीबाबत...

उपरोक्त विषयाबाबत आपल्या संस्थेतील दिनांक ३०/११/२०११ रोजी पर्यंत कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या मागासवर्गीय पदांच्या अनुशेषाची एकत्रित माहिती विवरणपत्र अ व पदनिहाय माहिती विवरणपत्र ब मध्ये तयार करुन अचूक माहिती तात्काळ दि.३१/१/२०१२ पर्यंत फॅक्सव्दारे या संचालनालयास सादर करावी. तसेच मुंबईतील संस्थानी खास दुताकरवी निम्नस्वाक्षरीकार कार्यासन क्रमांक ४/४अ,मुख्य कार्यालय,मुंबई यांच्याकडे हस्तांतरीत करावी. सदरची माहिती शासनास ~~सादर करावयाची असल्याने ती बिनचूक पाठविण्याबाबतची दक्षता घ्यावी. तसेच सदरची माहिती प्रत्येक~~ महिन्याला शासनास सादर करावयाची असल्यामुळे प्रत्येक माहिन्याच्या ५ तारखेपर्यंत सदरहू माहिती संचालनालयाला प्राप्त होईल अशा त-हेने संचालनालयास नियमित सादर करावी. अनुशेष भरण्याबाबत संस्थास्तरावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती सुध्दा सादर करण्यात यावी.

सदर परिपत्रकाची प्रत dte च्या websit वर Download section येथे उपलब्ध आहे.

(द श्री. कुकडे)

प्रशासकीय अधिकारी

तंत्रशिक्षण,महाराष्ट्र राज्य,मुंबई

जा. क्र. : तंशिविकापु/आस्था-२/अनुशेष/२०१२/ ८५९

~~दिनांक~~ : तात्काळ

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

४१२ ई, शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.

दिनांक : 30 JAN 2012

प्रत : प्राचार्य / संचालक, या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व अशासकीय अनुदानित पदवी व पदविका संस्था / स्वायत्त संस्था.

त्यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रामध्ये सूचना दिल्यानुसार त्यांनी त्यांच्या संस्थेतील मागासवर्गीयांचा अनुशेष भरण्याबाबतच्या कार्यवाहीबाबतची दिनांक ३०/११/२०११ रोजी पर्यंतची कार्यरत असलेल्या शिक्षक व शिक्षकेत्तर सेवकांच्या मागासवर्गीय पदांच्या अनुशेषाची एकत्रित माहिती विवरणपत्र अ व पदनिहाय माहिती विवरणपत्र ब मध्ये तयार करुन अचूक माहिती तत्काळ **दिनांक ३१/०१/२०१२ पर्यंत फॅक्सद्वारे** मुख्य कार्यालयास सादर करावी व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी.

(डी. एन. शिंगाडे),

प्र. सहसंचालक,

तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.

प्रत : ह्या कार्यालयातील प्रोग्रॅमर यांना सदरचे पत्र या कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी रवाना.

(२) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना माहिती व पुढील कार्यवाहीसाठी सादर.